# 'ताराराणींनी शिवरायांचा वारसा चालवला'

## कमला कॉलेजमध्ये भद्रकाली ताराराणी व्याख्यानमाला

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी साम्राजाचा अस्त करण्यासाठी आसुसलेल्या बादशहा औरंगजेबाला जेरीस आणलेल्या महाराणी ताराबाईंनी छत्रपती शिवरायांचा समृध्द वारसा यशस्वीपणे पुढे नेला' असे प्रतिपादन प्राचार्य मंगला पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने कमला कॉलेजमधील भद्रकाली ताराराणी व्याख्यानमालेत 'भ्रदकाली ताराराणींचे जीवन कार्य' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते. विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष रा. कृ. कणबरकर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. सुजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. आभार बी. श्री. शेळके यांनी मानले.